श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक

वर्ष २ रें.] मार्गशीर्ष शके १८४७ [अंक ९ वा.

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रा, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


स्फुट विषय ... ... ... [illegible]
महाराजांचे अनुभव ... ... ... ... [illegible]
श्री साईसच्चरित ... ... ... ... [illegible]


## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत यांच्या चालकांचा हेतू याची खर्च वजा खर्चवेंच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या सेवेला मधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकप्रकारें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रीतीनें मदत कर-णाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पड-तील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतोल व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांचे नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

श्रीसाईलीला ऑफिस, ५ सेंट मार्टिन्सरोड, वांद्रें बी. बी. सी. आय. रेल्वे.

## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु.३।=व्ही. पी. नें रु. ३॥ चालू अंक -।≈ मागील अंक शिल्लक असल्यास -॥

पूर्वीच्या अंकांत व्ही. पो. नें रु. ३॥≈ चुकून छापलें गेलें. असेंच ज्या कांहीं वर्गणीदारांकडे रु.३॥। ची व्ही.पी. चुकून गेली, त्यांचे -।- आमचे-कडे जमा आहेत. अशा वर्गणीदारांनीं -।- परत मागितल्यास पाठवून देऊं.

शके १८४७ वैशाख व ज्येष्ठाचा जोड अंक नं. २-३ आणि आषाढचा अं. ४ यांत श्रीसाईबाबांच्या छापलेल्या फोटोच्या कांहीं प्रतीसाठीं मागणी आल्यावरून त्या प्रत्येक फोटोच्या५०० प्रती छापवून तयार आहेत. ज्या कोणा'स त्या संग्रहीं ठेवण्याची इच्छा असेल त्यानें प्रत्येक प्रतीसाठीं ८२ चीं तिकीटें व आपला पत्ता पाठवावा म्हणजे हे फोटो त्यांजला बु.पो.नें पाठविण्यांत येतील.

## श्रीदत्तज्ञानसाईराजायनमः

सप्रेम सा. न. वि. वि. आपल्या सुंदर विबुधमान्य श्रीसाईलीलेच्या एखादे अंकी खालील मजकुरास व अनुभवांस कृपा करून स्थल द्यावें अशी सविनय प्रार्थना आहे.

आपण म्हणतां श्रीसाईलीला आतां बंद पडण्याची वेळ आली आहे. कारण कोणी अनुभव लिहून पाठवीत नाहींत. पण मला ही गोष्ट खरीच वाटत नाही. बाबांनीं भक्तोद्धाराकरितांच फक्त मानव-तनू धारण केली होती; परंतु ते मानव नव्हते. ते साक्षात् सच्चिदानंद परब्रह्म परमात्मा सगुण दत्त-ज्ञानावतारमूर्ती होते. ते जगदात्मे होते. ते अनंतबाहू होते. ते होते असें नव्हे; तर ते भक्त भावनेप्रमाणें व श्रीमद्भगवद्गीतेंत गाइल्याप्रमाणें "अनेक-बाहूदरवक्त्रनेत्रं, नांतं न मध्यं न पुनस्तवादिम्, अनादिमध्यंतमनंतवीर्यम्, अनंतबाहुं शशिसूर्यनेत्रम्" व्यक्ताव्यक्त, मूर्तामूर्त, दृश्यादृश्य स्वरूपांत आहेत, व यापुढेंही ते या स्वरूपांत अनंत काल राहणारच. आपलें लीला-नाटक अनंत बाहूंनीं करीत रहाणार. भक्तांच्या ठिकाणीं त्यांच्या लीला आप-लेकडे पाठविण्यांत थोडेसें सकारण वा निष्कारण शैथिल्य दिसत असेल. परंतु एकदां भक्तजनांस, अनंत हस्तांनीं अनंत लीला करणाऱ्या अनंतवीर्य श्री सद्गुरुराजांची आज्ञा व स्फूर्ती झाल्यानंतर बिचारे भक्तजन आपल्या दोन हातांनीं, नव्हे एकेकच हातानें आपले लीलानुभव लिहिणार किती! बाबांचा भक्तवृंद आपल्या यादीवर लिहिलेला इतका अल्पसंख्याक नाहीं. श्रीमद्भग-वद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें, "नांतोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप". बाबांच्या पुण्यलीला अनंत आहेत, व त्यापासून ज्ञान उत्पन्न होऊन त्या ज्ञानाचा अनुपमेय अनुभव घेणारे भक्तजनही अनंत आहेत. हल्लीं यादीवर असलेल्या भक्तजनांच्या संख्येपैकीं एक दशांशानीं श्रीसाईलीलेच्या प्रत्येक अंकास फक्त एकेकच अनुभव देण्याचें जरी मनांत आणलें तरी सुद्धां श्रीसाईलीला कमींत-कमी दहा वर्षें तरी बंद पडणार नाहीं. मग असंख्य भक्तांस स्फूर्ति झाल्यास, आपल्यासही बाणासुराचा, कार्तवीर्याचा किंवा निदान श्रीरामद्वेष्ट्या वीस भुजा

रावणाचा अवतार घेऊन बाबांचें लीलाकाव्य आपून काढण्याचें विकट पण गोड काम करावें लागेल. असो. भक्तजनांच्या ठिकाणीं श्रीसाईलीला लिहिण्याचें चैतन्यच नाहीं असें नाहीं. चैतन्य आहे; पण चैतन्यास चेतना नाहीं. आपण म्हणून म्हणून चेतना देण्याचें आपलें पवित्र कर्तव्य बजावित आहां तथापि प्रसिद्ध कविवर्य व नाटकाचार्य श्रीकालिदास कवीच्या अभिज्ञान शाकुंतलांतील ६ वे अंकांतील ३१ वे श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें—ज्वलति चलितेन्धनोऽग्निर्विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते; आपण प्रत्येक अंकीं स्फूर्तिदायक व चेतनात्मक कांहीं लेख लिहून भक्तजनांच्या कर्तव्यबुद्धिरूप इंधनाग्नीवर जी थोडीशी शैथिल्यरक्षा आलेली दिसते ती इंधनें हलविल्यास, किंवा भक्तजनकर्तव्यरूप पन्नग किंचित् निद्रावस्थेस जाऊन त्याचे ठिकाणीं थोडें शैथिल्य आल्यासारखें वाटतें त्यास डवचल्यास ती रक्षा जाऊन तो अग्नी प्रज्वलीत होईल, किंवा ती निद्रावस्था व तिजबरोबर असणारें शैथिल्य जाऊन तो उरगही आपली फणा काढून फूत्कार करूं लागेल.

वर लिहिल्याप्रमाणें सर्व भक्तगणांनीं मनावर घेतल्यास श्रीसाईलीला चिरायू झाल्यावांचून राहणार नाहीं. ह्या लीलामाई आतांच कोठेशा रांगू लागल्या आहेत. त्या आपल्या कामधेनू आहेत. त्या आपल्या बाळमंदारलता आहेत. त्या चमत्कार-चिंतामणी आहेत. त्या चमत्कार-विद्युल्लता आहेत; त्या अनंत भगिनी आहेत. त्या अनंत माऊल्या आहेत. दिवसेंनुदिवस त्या चंद्रकलेप्रमाणें वाढतच जाणार. पण पौर्णिमेस पूर्ण व अमावास्येस शून्य अशांतला त्यांचा प्रकार नाहीं. त्याही बाबांप्रमाणें त्रिभुवनैक व्याप्त असून अनंतकाळ वृद्धिंगतच होत रहाणार. बाबांच्या चरित्ररत्नाकरांतील त्या अमूल्य रत्नें आहेत. त्या अमृतमय अतएव अप्रतिम स्वादु आहेत. त्या कर्णसुभग आहेत. त्या कर्णानें प्राशन करून मननानें पचविण्याच्या आहेत; त्या अवीट आहेत. त्यांचें नित्य यथेच्छ अशन व प्राशनानें भक्तांस कधींही मोडशी होत नाहीं, अपचन होत नाहीं. उलट भवरोगामुळें कृश झालेलीं

अशक्ताया पीवर होऊन तिला बाबांच्या कृपेनें बाळसें चढलें, व रोगानें गलितगात्र झालेल्या तिच्या मस्तकावर नूतन कुटिल कुंतल-दिव्यज्ञानांकुर दृग्गोचर होतात.

जशा लीला अगणीत व अनुभव अगणीत तसे त्यांचे प्रकारही असंख्य. त्यांची विवक्षित जाती नाही. त्या हिंदु आहेत, मुसलमान आहेत, पार्शी आहेत, खिस्ती आहेत. त्यांना विवक्षित काळ नाही, त्यांना विवक्षित देश नाही, त्यांना विवक्षित पात्र नाहीं. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत व द्वारकेपासून जगन्नाथापर्यंत त्या आर्यावर्तावरील सर्व भागावरील सर्व जातींत, सर्व काळीं व सर्व सजीव व निर्जीव प्राण्यांत दृग्गोचर होतात. तशाच त्या वाटेल तो वेष धारण करतात. कधीं त्या कंगाल दरिद्र्याच्या झोपड्यांत दिसतील, तर कधीं त्या अलोट संपत्तिमान् गृहस्थाच्या सात मजली वाड्यांतही दृष्टीस पडतील. कधीं त्या पुरुषाचा वेष घेतील, तर कधीं त्या स्त्रीचा वेष धारण करतील. कधीं भिकाऱ्याचा, तर कधीं संन्याशाचा वेष घेतील. कधीं गलित कुष्टरोग्याचा, तर कधीं सत्पात्र ब्राह्मणाचा वेष घेतील. कधीं यजमानाचा, तर कधीं नोकराचा वेष घेतील. कधीं शंकराचा तर कधीं गणपतीचा; कधीं रामाचा तर कधीं दत्ताचा; कधीं हमालाचा, तर कधीं इतर साधुसंतांचा वेष धारण करतील. कधीं शिशूंचा तर कधीं वृद्धांचा वेष घेतील. कधीं आंग्लविद्याविशारदांच्या लेखन, पुराण, व्याख्यानांत नजरेस पडतील, तर कधीं अविद्यपुरुषांच्या लेखणींत व वाचेंतही दिसतील. कधीं साइभक्तपरायण बोवांच्या कीर्तनांतही वावरतील, तर कधीं काकासाहेब दीक्षितांच्या मोलकरणीच्या मुखांतून निघालेल्या सहज वृत्तीच्या ग्राम्य गायन ओवींतही खिदळतील. कधीं शेट सावकारांत, तर कधीं व्यापारी मंडळींत, कधीं खालच्या नोकरांत, तर कधीं उच्च दर्जाच्या व उच्च अधिकृत मंडळींतही दिसतील. सारांश, त्या कुठें अवतीर्ण होतील व कुठें भरारी मारतील याचा नेमच नाहीं. कधीं अश्वांत दिसतील तर कधीं म्हशींतही दिसतील, कधीं सर्पासारख्या भयंकर प्राण्यांत, तर कधीं क्रूर व

हिंस्र अशा श्वापदांची नक्कल करतील. कधीं पृथ्वीतत्त्वांत बसतील, तर कधीं आपतत्त्वास चिकटून राहतील. कधीं अग्नितत्त्वांत तर कधीं वायुतत्त्वांत आवि-र्भूत होतील. कधीं सुस्वरूप धारण करतील तर कधीं अगदीं कुरूप स्थितींत दिसतील. कधीं मधुर वचनांत दिसतील, तर कधीं गालीप्रदानांत दिसतील. कधीं ताडनांत दिसतील, तर कधीं पश्चात्तापानंतर प्राप्त झालेल्या शांत स्वरू-पांत दिसतील. कधीं नुसत्याच कोपांत, तर कधीं हास्यविनोदांतही नजरेस येतील. कधीं जागृतींत, तर कधीं स्वप्नांतही पुढें येऊन उभ्या राहतील.

महाराजांच्या ज्ञानमूर्तीसंबंधानें, त्यांच्या अमोल लीलांसंबंधानें व व्यावहारिक व पारमार्थिक अनुभवांसंबंधानें जितकें लिहावें तितकें थोडेंच होणार आहे. प्रत्यक्ष वेद जेथें मौनावतात, सहस्रजिव्हा शेष जेथें हात टेकतात व जगज्जनक चतुराननाची अमोघ लेखणी जेथें बोथट होते तेथें अल्पमति मानव किती लिहिणार ! तथापि आपण आपल्या दैवी, रसाळ व प्रतिभासंपन्न वाणीनें त्यांच्याच प्रेरणेनें व कृपेनें बाबांचें छोटेंसें पद्यात्मक चरित्र प्रत्येक अंकीं देऊन श्रीलीलामाईवर प्रेमालंकार चढवून तिचा अंक सुशोभित करीतच आहां; तथापि प्रथम श्रोत्रसुभग, महाप्रतापी, ओजस्वी व तारुण्यबलानें मुसमुसलेल्या अतएव सदैवप्रबल वेगवत्या अशा ज्ञान, लीला, अनुभवरूपी तीन महापुण्यसरित्संगम प्रयागांत व शेवटीं बाबांच्या मधुर, गंभीर व विस्तृत गद्यपद्य चरित्र महारत्नाकरांत यथेच्छ अवगाहन व मज्जन करण्याची सुदुर्दमनीय लालसा पुरी झाल्यावांचून श्रीसाईलीला बंद करणें केव्हांही श्रेयस्कर नाहीं. त्या प्रयागाचें व रत्नाकराचें दर्शन होण्यासच फार काल लागणार आहे. मग त्यांत अवगाहन व मज्जन करण्याची सुसंधी येण्यास श्रीसद्गुरुरायाची परम कृपाच पाहिजे. तथापि साईभक्तांनी कमर बांधल्यास हेंही दुर्घट काम 'मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम्' या न्यायानें सुकर झाल्यावांचून रहाणार नाहीं. बाबा त्यास स्फूर्ति देतील व मदतही करतील. काम त्यांचें व भक्तही त्यांचेच. निराश होण्याचें कारण नाहीं. कालांतरानें चरित्र जरी तयार झालें तरी श्रीसाईलीलामाईही श्रीगीतादेवीप्रमाणें नित्य नवी व टवटवीतच रहाणार.

अनुभवाव्यतिरिक्त महाराजांबद्दल काय-काय व किती किती लिहितां येईल तें माझ्या अल्पस्वल्पमतीप्रमाणें स्थूलदृष्ट्या मी खालीं देत आहे.

१. दिव्य व पुण्य महासरित् श्री गोदावरीमाई— जिच्या सान्निध्य अथवा जिच्या काठीं श्री क्षेत्र शेरडी वसलेलें आहे, त्या महानदीचा "गोदावरी महात्म" व "सिंहस्थ महात्म" यांत वर्णिलेला हृदयंगम इतिहास बाबांनीं या महापुण्य नदीचे तीरींच कां निवास केला, हें या महात्मद्वयावरून चांगलेंच प्रत्ययास येतें. पौराणिक अतएव त्यांतील कांहीं भाग अतिशयोक्तीचा किंवा अविश्वसनीय मानला, तथापि भूगोलदृष्ट्या तिची उत्पत्ती, काल व तिचा विस्तार या संबंधाचें वर्णन तिचें अद्वितीय श्रेष्ठत्व सिद्ध करून बोधप्रद झाल्यावांचून रहात नाहीं. मला तर त्यांत फार बहार वाटतें. गोदावरी, गंगा, यमुना, सरस्वती, भीमा, तुंगभद्रा आदीकरून द्वादशनद्यांचा परस्पर संबंध अगर नातें काय आहे, त्यांची विभागणी उत्तर, मध्य, व दक्षिण हिंदुस्थानांत कशी झाली आहे, ती कोणीं, केव्हां व कशाकरितां केली आहे, गोदावरीस वृद्धगंगा असें नांव कां दिलें अथवा मिळालें, तिच्या पुण्यत्वामुळें तिच्या तीरावरील खेड्यांस व नगरांस क्षेत्रत्व कसें प्राप्त झालें, हें त्या वर्णनावरून स्पष्टपणें ध्यानांत येतें. कोपरगांवास गोदावरी असतां ती शेरडीस केव्हां व कशी आली याबद्दल बाबांच्या अवर्णनीय लीलेचें परम कौतुक वाटतें.

२. शेरडी गांवाबद्दलही पुष्कळ माहिती मिळवून लिहिण्यासारखी आहे. शेरडी हा शब्द सार्थ आहे किंवा कसें? असल्यास तो कसा तयार झाला? त्याचा संस्कृत शब्द "शालधी, शैलाद्रि, सैरंध्री वा सैरिंध्री" यांच्याशी संबंध आहे कीं काय? हा शब्द मराठी आहे का फार्शी आहे, गुजराथी आहे का काठेवाडी आहे, का संस्कृताचा अपभ्रंश आहे? त्याचे अर्थावरून काय बोध होतो? हा गांव कोणी, केव्हां व कशाकरितां वसविला? हा गांव मूळ कोणाचा? यांत मूळ वस्ती कोणाची? या गांवास त्याचा स्वतःचा कांहीं इतिहास आहे कीं नाहीं? असल्यास तो काय? महाराजांनीं हाच गांव पसंत कां केला?

३. शेरडींतील बाबांची बसण्याची मशीद. ही मशीद कोणी, केव्हां, कोणाकरितां अगर कशाकरितां बांधिली ? मशीदींतील बाबांच्या बैठकीच्या वस्तू, धुनी, धुनीची लांकडें व गोवऱ्या, चिलीम, जातें, तुरबत, ठेल, तमाखू व छापी, बाबांचा जोडा वगैरे.

४. साठे साहेबांच्या नव्हे, आतां नवलकर साहेबांच्या वाड्याचे अंगणांतील लिंबाचा वृक्ष. तो कोणी, केव्हां व कशाकरितां लावला. त्याचा इतिहास. त्याचा बाबांशीं संबंध.

५. शेरडींतील लेंडी ओढा. लेंडी नांव कसें पडलें ? लेंडीशीं बाबांचा संबंध. लेंडीवरील कांहीं जागा. लेंडीवरील बाबांची बाग.

६. राहतें गांव व तेथील मारवाडी,—ज्यांचे घरीं बाबा कधीं कधीं जात, बसत व परत येत. शेरडी, राहते, राहत्याचे मारवाडी व बाबा यांचा परस्पर संबंध. " राहते " या शब्दाची व्युत्पत्ती व राहते गांवचा इतिहास.

७. कै. भक्त शिरोमणी रा. रा. नानासाहेब चांदोरकर, कै. कृपापात्र व बाबांचे बालपणापासूनचे परमभक्त म्हाळसापति, कृपापात्र बाळकराम, मुक्ताराम, नानासाहेब निमोणकर, मेवा, तात्यासाहेब नूलकर, दादासाहेब केळकर, बाळासाहेब भाटे, श्री० बापूसाहेब बुटी. वडे बाबा, सौ. जोग आई, राधाकृष्ण, तात्या पाटील, कोते यांची आई, अण्णा चिंचणकर, वगैरे मंडळींचा व महाराजांचा अनेक पण निरनिराळ्या तऱ्हेचा संबंध. बाबांनी सांगितलेल्या व त्यांचेकडून करवून घेतलेल्या कामगिऱ्या.

८ शेरडी संस्थानची कच्ची विस्तृत हकीकत. महाराजांचे हयातींतील व समाधिस्थ झाल्यानंतरची श्रीसाईलीलेंत वेळोवेळीं स्फुट रीतीनें प्रसिद्ध झालेली ती एके ठिकाणीं संकलित लिहिण्यासारखी आहे. संस्थानचे चालक, व्यवस्थापक व व्यवस्था.

९ शेरडी संस्थानांतील चार उत्सव कधीं व कसे सुरू झाले व हल्लीं ते कोणत्या स्वरूपांत आहेत व कोणाचे देखरेखीखालीं चालतात व ते कोणी कोणी पत्करले आहेत.

१० संस्थानचे जमाखर्चाची व्यवस्था, नोकर चाकर लोकांच्या नेमणुका, त्यांचे पगार, त्यांच्या कामगिऱ्या व त्यांच्यावरील देखरेख.

११ संस्थानची स्थावरजंगम मिळकत व कायम फंड, मासिक व नैमित्तिक वर्गणी. त्याचा जमाखर्च, त्याची व्यवस्था व त्याजवरील देखरेख.

१२ बाबांचे फोटो, बाबांचा घोडा, बाबांची समाधि, समाधिसंबंधानें, स्नान, अभिषेक, पूजा, धूप, दीप, नैवेद्य, दक्षणा, नंदादीप, चौवडा, आत दर्शन, समाधि स्पर्शन वगैरेची हकीकत. मंदिरांतील समाधीजवळ ठेवलेले व मशीदींत ठेवलेल्या पेट्यांतील पैशांची व्यवस्था.

१३. बाबांचा दररोजचा दिवसाचा व रात्रीचा वर्तनक्रम.

१४ बाबांचा वेष, डोक्यांचें फडकें, अंगांतील कफनी व नेसण्याची लंगोटी.

१५. बाबांचे सकाळचें उठणें. लघुशंका, शौचविधी, तोंड धुणें, स्नान करणें, आसनावर बसणें.

१६ बाबांची भिक्षा, बाबांची न्याहारी.

१७ बाबांच्या फात्या, बाबांचे सकाळ संध्याकाळचे विवक्षित जागी व विवक्षित वेळीं फिरणें व हातवारे करणें, विवक्षित गृहस्थांशीं बोलणें, लेंडीवर जाणें, शौचविधी करणें व बागेंतील झाडांस स्वतः पाणी घालणें व त्यांस कुरवाळणें.

१८. लेंडीवरून परत आल्यावर मशिदींतील आसनावर बसणें, भक्तजनांस दर्शन प्रसाद देणें, त्यांच्या मनीषा तृप्त करणें, त्यांच कामाचा उलगडा करणें.

१९. बाबा व पूजा व आर्ती.

२०. बाबा व फळफळावळ, नैवेद्य व भिक्षा.

२१. बाबा व खाणें. ( युक्ताहार विहारस्य )

२२. बाबा व कफन्या व चिलमी.

२३. बाबा व श्रीउदी.

२४. बाबांचें निजणें व चावडी.

२५. बाबांवरील आक्षेप.

१ बाबा दक्षणा मागतात.

२ बाबांचे जवळ राधाकृष्ण कशाला ?

३ बाबा मुसलमान आहेत.

२६. बाबांचें दातृत्व, सर्व प्राणीमात्रांवर समदृष्टी, जातिभेदाभाव.

२७. बाबांचा राग, गालीप्रदान, ताडण व त्यावेळीं तोंडांतले तोंडांत म्हणत असलेला महामंत्र. अनुराग, भक्तवात्सल्य, कळकळ, सर्वभूतहितैक दृष्टी.

२८. बाबा हिंदु का मुसलमान ? हिंदु असतील तर ब्रह्मचारी, गृहस्थाश्रमी का संन्यासी. ?

२९. बाबा शास्त्री का पंडित, मुनी, तपी, व्रती, योगी, सिद्ध का ब्रह्मनिष्ठ का कवी ?

३०. बाबा वैद्य का मांत्रिक का गारुडी ?

३१. बाबा देव का परब्रह्म ?

३२. बाबा व ब्रह्मज्ञान. द्वैत का अद्वैत ?

३३. बाबा व त्यांचें नांव, जाति, कुल व गोत्र, जन्मठिकाण, पूर्वपरंपरा.

३४. बाबा व साधुपरीक्षा.

३५. बाबा व लहानपण, मोठेपण, वेड, स्वार्थ वगैरे. ( अल्ला मालिक "अमानित्वं" श्री गीता. )

३६. बाबांची योग्यता, किंमत, ऐश्वर्य, सामर्थ्य, ( फळी, पाण्याच्या पंत्या, प्रिटोरिया, वाटेल तो देह धारण करणें वगैरे. )

३७. बाबा व इतर तत्कालिन व पूर्वकालिन साधुसंत. बाबांचा व त्यांचा संबंध. त्यांच्यावरील प्रभुत्व व छाप. बाबांचें तासयंत्र ( श्री समर्थ तुकाराम, पद्मालय महाराज, बनुमाई वगैरे. )

३८. बाबा व भक्तिज्ञान, वैराग्य.

३९. बाबा व श्री गीता. ( कै. नानासा. चांदोरकर )

४०. बाबा व श्रीज्ञानेश्वरी, श्री एकनाथी भागवत, श्री दासबोध, श्रीभावार्थरामायण, श्री भागवत, श्री भारत वगैरे.

४१. बाबा व नगरजिल्हा.

४२. बाबा व दोन खिडक्या ( श्री भगवद्गीता )

४३. बाबा व एक खिडकी व सात समुद्राचें राज्य (ज्ञानेश्वर व तुकाराम महाराज )

४४. बाबा व कांदा.

४५. बाबा व उरूस, उत्साह, तमाशे.

४६. बाबा व गवई ( स्वतःच गवई )

४७. बाबा व मुलें.

४८. बाबा व मिठोरिया.

४९. बाबा व त्यांची विश्वव्याप्ति.

५०. बाबा व त्यांची भाषा, गोष्टी व त्यांचे अर्थ ( ज्ञानेश्वरी अ. १७ )

५१. बाबा व विवक्षित भक्तजनांची विवक्षित नांवें व सर्व स्त्रियांस "आई" हें नांव.

५२. बाबा व ग्रंथ-परीक्षण.

५३. बाबा व त्यांची शिकवणूक व उपदेश पद्धत ("न बुद्धिभेदं" श्री गीता).

५४. बाबा व लघु व उच्च विद्यापीठें.

५५. बाबा कोणत्या विद्यापीठांत पढले ?

५६. बाबा व वेदशास्त्रपुराणें व उपनिषदें.

५७. बाबा व अधिकारी वर्ग.

५८. बाबा व राजकारण.

५९. बाबा व त्यांचा दरबार.

६०. बाबांचे दरबारांत अधिकारी व अधिकाऱ्यांचे कोर्टांत बाबा.

६१. बाबा व पारमार्थिक धडे-धडे पाठ न केल्यास बाबांची शिक्षा—भक्त-परीक्षा—विचारपूस.

६२. बाबांची संकटसूचना, संकट निवारणाची अद्भुत शक्ति व [illegible] शैली.

६३. बाबा व एकादशी.

६४. बाबा व माधवराव देशपांडे.

६५. बाबा व त्यांची समाधि अगर दर्गा. बाबा व देहधारी पुरुषांचे नियम.

६६. बाबा व मुक्त व विदेही पुरुषांचे नियम.

६७. बाबा व पुनर्जन्म, व शरीरभोग, इच्छाजन्म व इच्छामरण.

६८. बाबा व शिल्पशास्त्र ( मशीद बांधण्याचे वेळचें )

६९. बाबा व बर्फी व साखर व साखरपाणी ( कै. नाना सा. चांदोरकर, रशियन मल्ल )

७०. बाबा व वैश्वदेवांतील अतिथी, अतिथी शब्दाची व्याख्या.

७१. बाबा, देव व देवता. बाबांचे देव, देवतांवरील प्रभुत्व.

७२. बाबा व मानवेतर सजीव प्राणी. व्याघ्र, सर्प, विंचू, घोडा, गाय, म्हैस, कुत्रा, मांजर, माशी वगैरे.

७३. बाबा व त्यांचें प्रयाग. ज्ञान, लीला, अनुभव. गंगा, यमुना, सरस्वती ज्ञान लीला वाचा. ,, ,, ,,

७४. बाबा व बाबांनीं केलेल्या व बाबा करीत असलेल्या लीलांमुळे जगास मिळत असलेलें ज्ञान व येत असलेले प्रत्यक्ष अनुभव.

या अनुभावाचे पुष्कळ प्रकारें वर्गीकरण करतां येईल.

व्यावहारिक व पारमार्थिक, जागृतीमधील व स्वप्नांतील.

७५. अनुभावांवरून निघणारीं अमूल्य अनुमानें, अनभावांची योग्यता व श्रेष्ठत्व.

७६ वर्तनचरित्र, लीला चरित्र, ज्ञानानुभव चरित्र. गद्यात्मक भाग, पद्यात्मक भाग. पदें, आरत्या, भुपाळ्या, शेजारत्या, पाळणें, स्तुतिस्तोत्रें, नमन-

स्तवनात्मक निरनिराळ्या वृत्तांतील व मीटर मधील मराठी, संस्कृत, गुजराथी व इंग्रजी कविता.

७७ बाबांचें अवतारकार्य.

वर लिहिलेल्या चरित्ररत्नाकर सामुग्री संबंधानें त्याच जगच्चालकाच्या कृपाप्रेरणेनें आणखी कांहीं विचार सुचल्यास पुढें देईन.

शेरडी कशी असावी याबद्दलचेंही फार दिवस मनांत घोळत असलेले विचार पुढें देईन.

त्याचप्रमाणें वर वचन दिलेले अनुभवही पुढेंच लिहीन.

शेवटीं अनन्यगतिक श्री समर्थ सद्गुरु साइगंगाधराचें पुण्य चरणावर खालील श्लोकत्रय वाक्त्रिदल बिल्वपत्र अनन्यभावानें अर्पण करून हा बराच लांबलेला लेख पुरा करून आपली रजा घेतों.

अनुष्टुप्.

नमस्ते ब्रह्मरूपाय साइनाथाय ते नमः ।
नमस्ते विष्णुरूपाय साइराजाय ते नमः ।
नमस्ते रुद्ररूपाय साइबाबाय ते नमः ।
नमस्ते दत्तगुरवे ज्ञानदेवाय ते नमः ॥ १ ॥

साकी.

निवासयोग्यं स्थलमति सुखदं मतिदं गतिदं विमलं ।
समर्थसद्गुरु सांबसदाशिव साइराज पद कमलं ।
वंदे तच्चरणं । सत्यं भवाब्धितरणं ॥ वंदे ॥ २ ॥

अर्थ—राहण्यास योग्य असें अति सुखदायक, बुद्धीला प्रेरणा करणारें, शेवटी मोक्ष देणारें व सर्वप्रकारें शुद्ध जर कोठें स्थल असेल तर तें श्रीसमर्थ सद्गुरु निरंतर कल्याणकारक सांबावतार साइराज पदकमलाचें ठिकाणच आहे, खरोखरच संसारसमुद्र तरून जाण्याचें तें तारूं आहे. अशा या चरणकमलास मी वंदन करतों.

रथोद्धता.

साइराज चरणं सुभगं ते ।
इष्ट काम फल मुक्तिद स्तु ।
रामराज चरणाय ते नमो ।
जन्ममृत्युहरं हि गजानन ॥ ३ ॥

अर्थः—हे साइराजा, तुझे चरण भाग्यशाली आहेत. ते इच्छित मनोरथांचे अंतिम फल जी मुक्ति ते देणारे असे असोत. हे साईरामराजा, तुझ्या चरणाला मी वंदन करतो. हे साइगजानना, तुझे चरण जन्ममृत्यूंचा नाश करणारे आहेत.*

अध्रुनेत्यलम्.
ठाणें १०-९-२५

बाबांचें बाळ.

ह. भ. परायण रा. रा. के. जे. भीष्म यांनी रचिलेली व श्री. साईनाथांचे समाधीसन्निध म्हणविण्यांत आलेली पदें:—

पदः—( गुरु करण्याची अवश्यकता )

( सारंग )

साइनाथ सच्चिद्धन जगतीं सगुणमूर्ति ही अवतरली ॥
जड मूढांना नव बोधामृत पाजुनि स्वस्वरूपीं विरली ॥ ध्रु० ॥
गुरू कशाला हवा मानवा वदती श्रद्धाहीन कुणी ॥
नीतिधर्म वेदांत-ग्रंथ हे बघुनि रहावें स्वस्थ मनीं ॥
ऐसे वदती बहुपरि न दिसे ग्रंथें वृत्ति स्थिर झाली ॥ १ ॥
सद्ग्रंथें स्वमतीला मिळतें चालन ही त्यांची महती ॥
परि सद्वर्तन सुस्थिर व्हाया निकट पाहिजे सद्विभुती ॥
त्यांतहि जेथें प्रबोधशक्ति प्रगट न करितां ही दिसली ॥ २ ॥

* वरील पत्र वाचकांना सादर केलें आहे. अशांच तऱ्हेनें इतर वाचकवृंदांनी आपलीं मतें कळविल्यास पुढचें धोरण ठरविण्यास सोईचें होईल.

—संपादक

प्रबोधशक्ति तीच म्हणावी बोधें या ईक्षणि मनुजा ॥
सद्गुरु चरणीं सद्भतिनिही होतें सुस्थिर मन समजा ॥
हवा अशास्तव सद्गुरु मनुजा मर्यादा शास्त्रें केली ॥ ३ ॥
गुप्त प्रगट गुरु बोध करीती अर्थ भक्त करिती स्वमनें ॥
पूर्ण मनीशा जशी जयाची होती त्या सद्गुरु वचनें ॥
स्वानुभवानें कृष्णदास मति सद्गुरु चरणांध्रीं जडली ॥ ४ ॥

## सद्गुरूची व्यापकता

पद (असावरी)

सब जगमें ये भरा नाथ साई ॥ ध्रु० ॥
भूजल तेज समिर गगनमें ठाव सुना नहि कोई ॥ १ ॥
रूप अरूप नाम निशानन परसत्ता सब छाई ॥ २ ॥
जो मन माने रूप भजे नर सो रूप सगुण दिखाई ॥ ३ ॥
कृष्णानंदसु सगुण भजनमें निर्गुण की छबछाई ॥ ४ ॥

श्री सद्गुरु समर्थ.

श्री संपादक साईलीला मासिक यांस—

सप्रेम नमस्कार वि. ॥ वि.॥ लिहिण्यांत येतें कीं श्री सद्गुरूंच्या प्रेरणेनें आत्मबोधाचा व साई महाराजांच्या नामाचा तिळगुळ तयार केला आहे. तो येत्या संक्रातीस आपल्या साईभक्तांस संक्रांतीनिमित्त चाखा या हेतूनें आपल्या साईलीला मासिकांत प्रसिद्धीकरितां पाठविला आहे. करितां प्रसिद्ध होईल अशी आशा आहे.

## आत्मबोधाचा तिळगुळ.

पद. (चाल. माझा कृष्ण देखिला काय.)

घ्या हो तिळगुळ। निजात्मबोधाचा ॥ धृ. ॥

घेउनि सद्गुरु बोधाचे तिळ । मिळवूनि ज्ञानरूपी गुळ ।
प्रेमभावें केला तिळगुळ । द्यावया बांधवांना ॥ १ ॥
काम-क्रोधा-दिक षड्रिपू । भरल्या आंत ज्ञानाच्या पीठें ।
तेणें आह्मी झालों खट्टू । ऐसें भासतसे ॥ २ ॥
सद्गुरु बोधाचे तिळ खावे । कामादिकासि व्यायाडावें ।
आपुलें स्वरुप ओळखावें । तेणें जिवा सुख होय ॥ ३ ॥
हा तिळगुळ असे गुप्त । शोधा आंट पिटाच्या आंत ।
पहा आत्माराम निवांत । सार्थक होय जिवाचें ॥ ४ ॥
हाचि सविता तिळगुळ । बाधूं न शके कळीकाळ ।
ऐसें सद्गुरु वचन प्रबळ । म्हणूनि तुम्हां देतसें ॥ ५ ॥
हा प्रेमानें घ्या तिळगुळ । आनंदें सेवा सर्वकाळ ।
दत्तदास होऊनि प्रेमळ । प्रार्थीतसे तुह्मां ॥ ६ ॥

साईनामाचा तिळगुळ.

॥ अभंग. ॥

साईरूप तीळ । साईनाम गुळ । सेवा सर्वकाळ । प्रियबंधू ॥ १ ॥
आवडतें मना । साईचें हें नाम । आनंदाचा धाम । साईनाथ ॥ २ ॥
याच कीं नामाचा । केलासे तिळगुळ । सेवितां तो काळ । दूर राहे॥३॥
हाचि तीळ तुह्मीं । सांडु नका कधीं । विनंति ही आधीं । माझी तुह्मां ४
हाचि तिळगुळ । देत असे तुह्मां । विसरूं नका कदां । साईनाथा ॥ ५
दत्तदास म्हणे । जाग्रति स्वपनि । ध्यावा साई मनीं । प्रेम भावें ॥ ६

आपला नम्र.

दत्तदास—पांडुरंग रामचंद्र राणे.

नं. २ सुंदर गल्ली, हेन्स रोड, भायखळा—मुंबई.

मित्रवर्य अण्णासाहेब दाभोळकर, मु० बांद्रें, यांस नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे, मु. पुणें, कृ. सा. न. वि. वि.

श्रीसाईलीलेचा बारावा अंक आज पोहोंचला, त्यावेळीं मित्र रा. रा. रामचंद्र वामन उर्फ भाऊसाहेब मोडक हे मला भेटण्यासाठीं आले होते; त्यांच्या सांगण्यांत असें आलें कीं, अलीकडे त्यांच्या सांगली येथील घरीं नेहमी साप निघूं लागल्यामुळें त्यांनीं अनेक उपाय करून पाहिले, तरी ते निघतच असत; तेव्हां सरतेशेवटीं त्यांच्या कुटुंबानें जिकडून साप निघत असत त्या बाजूला चोहोंकडे श्री बाबांची उदी टाकली, व तेव्हांपासून साप निघेनातसे झाले.

असल्या प्रकारचा आज पंधरा वर्षांत मला कांहींएक अनुभव आलेला नाहीं, ह्याचें कारण असें वाटतें कीं, माझी शंकेखोर बुद्धि श्रीबाबांना पूर्णपणें माहीत होती; आणि असल्या गोष्टीवरून काल्पनिक रीतीनें माझें कधींही समाधान होणार नाहीं, असें मीही त्यांना निक्षून सांगितलें होतें; तेव्हां मला अशा तऱ्हेचे अनुभव यावे कसे ? श्रीबाबा हे कल्पतरुवत् असल्यामुळें, मला जें हवें आहे तेंच ते मला देणार व देतही आहेतच; आणि त्यांतच माझें पूर्ण समाधान आहे. कळावें, ही विनंती.

रा. रा. कृष्णराव नारायण परुळकर ऑनररी मॅजिस्ट्रेट, हर्दा यांचे ता. १-९-१९२५ च्या आलेल्या पत्रांतील अनुभव:—

आमचे येथें आमच्या वडिलांपासून दरवर्षी श्रीदत्त महाराजांचे प्रीत्यर्थ १०० ब्राह्मण जेवावयाला घालण्याचा परिपाठ आहे व तो आजपर्यंत चालत आला आहे. एखादे वर्षी कांहीं अडचणीमुळें हें ब्राह्मणभोजन राहिल्यास दुसरें वर्षी दोनशें ब्राह्मणांचें भोजन होतें. समर्थ श्री साईमहाराज समाधिस्थ झाले त्याच्या दुसरें वर्षी दोन वर्षांचे ब्राह्मण घालावयाचे होते, त्यासंबंधीं विचार होऊन एका शनिवारीं २०० ब्राह्मणांचें ब्राह्मणभोजन करण्याचें ठरलें. हा विचार सोमवारीं ठरला. दुसरे दिवशीं मंगळवारीं सकाळीं पांच वाजतां नित्य नियमाप्रमाणें उठून नामस्मरण करीत असतां

एकदम मनांतूनच हे उद्गार निघाले कीं, जर या ब्राह्मणभोजनांत श्री जेवून जेवावें अशी तुझी इच्छा असेल तर मुंबईहून काकाला ( रा. रा. दीक्षित यांना महाराज काका म्हणत असत ) बोलाव. परंतु मनांत असें वाटलें कीं, नुसत्या जेवणाकरितां काकासाहेबांना येवढ्या लांब कसें बोलावावें ? हा विचार दुपारीं बारा वाजेपर्यंत चालला होता. बारा वाजतां श्री समर्थांचें पूजन करूं लागलों त्यावेळीं पुन्हां मनाला स्फूर्ति झाली कीं, मग घोटाळ्यांत काय पडला आहेस ? तूं काकाला पत्र लिही म्हणजे माझ्या आज्ञेनें तो येईल व त्याला सर्व ब्राह्मणांबरोबर भोजन घाल व मी जेवून गेलों असें समज. त्याप्रमाणें दुपारींच रा. रा. काकासाहेबांना झालेली हकीकत लिहिली व आमंत्रण केलें. परंतु मनाला सारखी तळमळ लागली होती. असें वाटे कीं, जर काकासाहेब बोलावल्याप्रमाणें आले नाहींत तर हें ब्राह्मणभोजन व्यर्थ आहे. शनिवार सकाळपर्यंत काकासाहेबांचें काहींच उत्तर नाहीं यामुळें फार हुरहुर लागून वाईट्ट वाटलें. श्री समर्थांचे तसबिरीपुढें जाऊन प्रार्थना केली कीं मी पापी आहें. माझ्या घरीं आपले चरण लागून भोजन होणें हें माझ्या नशिबांत नाहीं. डोळ्यांत आसवें आलीं. साष्टांग नमस्कार घालून अनन्य भावानें शरण गेलों. घरांत तयारी होऊन पाट रांगोळ्या घालूं लागले. मी स्नान करून संध्या करण्यास बसलों. इतक्यांत पोष्टाचा शिपाई तार घेऊन आला. फोडून वाचतां तींत काकासाहेबांनीं असें लिहिलें होतें कीं मी व रा. रा. माधवराव देशपांडे डिल्ली एक्सप्रेसनें येतों. तार वाचून जो आनंद झाला तो व्यक्त करितां येत नाहीं. ताबडतोब श्री समर्थांना साष्टांग नमस्कार घातला व मित्र मंडळीसह स्टेशनवर जाऊन काकासाहेबांना व माधवरावजींना घरीं आणलें. त्यांचे बरोबर ब्राह्मणभोजन समारंभ झाल्यावर श्री समर्थ साईमहाराज आपले घरीं येऊन जेवले असें मनाला समाधान वाटलें. अर्थात महाराजांच्या आज्ञेनेंच काकासाहेब इतक्या लांब आले.

* * *

रा.रा.काकासाहेब दीक्षित यांचे चि.बाबू याचें लग्न खांडव्यास होतें. लग्नतिथि षष्ठी किंवा अष्टमी असावी असें वाटतें. लग्नाचे सर्वांस आमंत्रण

होते व हरदाहून बरीच मंडळी गेलीही होती. परंतु त्या सुमारास रा. रा. सदाशिव धुंडीराज नाईक यांची मातोश्री अत्यंत बीमार होती व केव्हां जाईल याचा भरवंसा नव्हता. लग्नास जाणाऱ्या मंडळींपैकीं नाईक मंडळीही होती. लग्नास ४।५ दिवस राहिले. एके संध्याकाळीं आम्ही सर्व बसलों असतांना रा.रा. कृष्णराव लक्ष्मण नाईक म्हणाले कीं, काकासाहेबांचे येथें लग्नास जाण्याची फार इच्छा आहे, परंतु सदूभय्या, तुझी आई आड येईल याचें मोठें भय वाटतें. सदूभय्या म्हणाले कीं, तशी स्थिति आहे खरी. पुढें सर्व मंडळी घरोघर गेली. पुढें पहाटें श्रीसमर्थ माझ्या समोर उभे राहिले. त्यावेळीं मी अर्धवट जागा होतों. समर्थ मला म्हणाले कीं "सदूला सांग कीं त्याची आई काकाचे येथील लग्नांत आड येणार नाहीं, ती एकादशीला जाईल. सकाळीं ही हकीकत सदूभय्या इत्यादि मंडळींना सांगितली व महाराजांच्या विश्वासावर सर्वजण लग्नास गेलों. चमत्कार हा कीं,लग्न समारंभ झाल्यावर श्री समर्थांचे सांगण्याप्रमाणें सदूभय्याची आई एकादशीलाच बारा वाजतां निवर्तली.

## सौ. चंद्राबाई आर. बोरकर यांचेकडून आलेला मजकूर

श्री क्षेत्र नाशिक नजीक असावली म्हणून एक लहान खेडें आहे. तेथें आह्मी रहात होतों. एके दिवशीं आमच्याकडे कामावरून आल्यावर अकस्मात् ताप आला. ताप ३ च्या पुढें चढला. त्याठिकाणीं आह्मी दोघेच होतों. औषध म्हणजे उदीशिवाय कांहीं नाहीं. रात्रीं दोन वाजतां तिकडे जराशी झोप लागलेली दिसली, तेव्हां मीं पायाकडेच पडलें. पहाटेस ३ वाजतां मला स्वप्न पडलें तें असें,—एक कफनी घातलेले असे म्हातारे फकीर आले व म्हणाले, " बाई, तूं घाबरूं नकोस. आतां घाम येणार. उदी लाव व सकाळीं ११ वाजेपर्यंत कोठें बाहेर जाऊं देऊं नकोस." मी उठलें आणि पहातें तों सर्व अंगास घाम आलेला. तो मी पुसला व उदी लाविली आणि जवळ स्वप्न सांगितलें. पण तिकडे बाबांच्यावर श्रद्धा कमी होती. तेव्हां ऐकणें झालें नाहीं व तसेंच स्टेशनवर जायचें झालें. आमच्या घरापासून स्टेशन जवळच होतें. ती वेळ मनमाडहून येणारी मेल व मुंबईहून जाणारी

प्यासेंजर यांची होती. प्यासेंजर येऊन थडकली. गाडीतून पडलेला कांहीं बाबरोबर बोलत उभे होते ते मेलच्या रस्त्यांत होते. मेल आलेली माहित नाही. इतक्यांत मेल आली व मेलचा धक्का लागून तिसऱ्या स्टेशनवर कसे पडले तें एका माझ्या कृपाळू बाबांनांच ठाऊक. सर्व लोक आश्चर्य करूं लागले. जरा पुढें मी उभी होते. मेल गेलेली पाहून " बाबा " अशी मोठ्यानें किंकाळी फोडून दारापुढें बेशुद्ध पडलें; इतक्यांत पोर्टर येऊन सांगूं लागला, "धांवा, हातापायास फारच लागलें आहे. उचलून नेऊन घरा." मी स्टेशनवर धांवतच गेलें व एका नोकराच्या सहाय्यानें घरीं घेऊन आलें व खाटेवर निजविलें. पायांच्या हाडांला बरेंच लागलें होतें. उदी व चिंचे यांचे मिश्रण करून घट्ट पायांवर बांधलें व सर्व अंगास उदी लाविली. थोडावेळ मी तिकडेच बसलेली होतें, इतक्यांत शुद्धीवर येऊन 'मी कुठें आहें? आमच्या घरांत एक फकीर शिरला आहे' असं मोठ्यानें जागें झाल्यासारखें करून ओरडायचे झालें. मीं म्हटलें, "आपले बाबाच आहेत. बाबांशिवाय आपलें जगांत कोणी नाही.पण बाबांचेवर आपला विश्वास नसल्यामुळें स्टेशनवर न ऐकतां जायाचे झालें. परंतु ही वेळ बाबांनींच टाळली व आनंदाचे दिवस दाखविले. आज बाबांचा गुरुवार आहे. कित्येक वेळ आपण शिर्डीस जायचें म्हणून पाठीस लागलें होतें, तेव्हां असें म्हणणें झालें कीं तुझे बाबा आतां शिर्डीस असते तर मी बरा झाल्यावर शिर्डीस गेलों असतों. मी म्हटलें,'बाबा सदोदित शिर्डीस आहेत व माझ्यापाशीं पण आहेत. त्यांच्या शिवाय हे सौख्याचे दिवस कोण दाखवणार आहे.' दुसऱ्या दिवशीं रेल्वे डॉक्टर येऊन ब्यांडेज वगैरे बांधलें. पण त्या योगानें पाय फारच दुखावला. पायाचें हाड मोडलें होतें. रात्रीं ११ वाजतां मला स्वप्न पडलें त्यांत कफनी घातलेल्या फकीरानें येऊन विचारलें, " काय करतेस ? पाय मोडून टाकते कीं काय ? वनीचा पाला आणून त्यांत मीठ हळद व जोंधळे असे गरम करून शेकीत जा, खोबरें, भिलावें व उदी पायांवर बांधून ठेव व वरून शेक दे. ' असें सांगितलें. १ महिना पर्यंत केलें. मोडलेलें हाड बरें झालें. हें माझें मामुली औषध पाहून रा. रा. फाटक वगैरे मोठमोठ्या कंत्राटदारांना व घरांतल्या सर्व मंडळींना फार आश्चर्य वाटलें; आणि तेव्हांपासून त्यांची श्रद्धा बाबांवर बसली.

## अध्याय ३५ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरूसाईनाथाय नमः ॥

मागां गताध्याया अंतीं । दिग्दर्शन कथानुसंगती ॥
कथिली तीच कथितों संप्रती । ती स्वस्थ चित्तीं परिसिजे ॥ १ ॥
करूं जातां परमार्थ विचार । पंथाभिमान अडवी भयंकर ॥
विघ्न नाहीं अति दुर्धर । या अभिमानासम दुजें ॥ २ ॥
आम्ही निराकाराचे भजक । साकार देव हा भ्रममूलक ।
साधुसंत हे मानवचि देख । नमवावें कां मस्तक तयांपुढें ॥ ३ ॥
तयां न घालावें लोटांगण । तयां न द्यावें दक्षिणादान ॥
खालवावी न यत्किंचित मान । विडंबन हें भक्तीचें ॥ ४ ॥
शिरडीसंबंधें अनेकांहीं । कोणी कांहीं कोणी कांहीं ॥
अनेक वार्ता कथिल्या पाही । विश्वसनीय नाहीं या सकळ ॥ ५ ॥
म्हणती तेथें जातां दर्शना । साईबाबा मागती दक्षिणा ॥
साधू जे लागती द्रव्य संपादना । साधुत्वा हीनपणा तयांच्या ॥ ६ ॥
अंधश्रद्धा नव्हे बरी । प्रत्यक्ष अनुभव घेतल्या उपरी ॥
ठरवूं निर्णय अपुल्या अंतरीं । कैसिये परी वर्तावें ॥ ७ ॥
आपण नाहीं देणार दक्षिणा । जया मनीं वित्ताची कामना ॥
तयाचें साधुत्व येईना मना । अपात्र नमना तो आम्हां ॥ ८ ॥

असो आम्ही शिरडीस जाऊन । गेऊं तयाची भेट घेऊन ॥
करणार नाहीं चरणवंदन । अथवा प्रदान दक्षिणेचें ॥ ९ ॥
जो जो ऐसिया कुतर्कें निघे । जरी आपुल्या कृतनिश्चया जागे ।
अखेर तोही दर्शनयोगें । शरण रिघे साईस ॥ १० ॥
जो जो साईस पाहूं सरला । तो तो जागचे जागींच ठेला ।
पुनश्च नाहीं मागें परतला । पायींच रतला साईच्या ॥ ११ ॥
धरुनियां दांतीं तृण । जैसें कोणी यावें शरण ।
तैसिये परी वंदी चरण । पावोनि विस्मरण निश्चया ॥ १२ ॥
पंथाभिमाना जेथें विसावा । सौख्य वाटेल अत्यंत जीवा ।
तो हा अध्याय परिसावा । श्रोतीं परिसावा सादर ॥ १३ ॥
तैसीच सूचित उदीची ख्याती । बाळा नेवासकराची प्रचीती ।
कैसा सर्प संभाविला प्रीती । साईच तयाप्रति भावून ॥ १४ ॥
कृपा करा श्रोते मजवर । मी तो केवळ आज्ञेचा किंकर ।
आज्ञा पाळूं जाणें सादर । उद्भवलें अक्षर चरित्र हें ॥ १५ ॥
दृष्टि ठेवितां चरणावरी । तेथूनि उमटती पदलहरी ।
पवित्र चरित्र कुंभांतरीं । वरिचेवरी मी भरितों ॥ १६ ॥
कासवीचीं आम्ही पिलीं । केवळ दृष्टिक्षेपें पोसिलीं ॥
नाहीं तान्हेलीं भुकेलीं भागलीं । सदैव ठेलीं संतृप्त ॥ १७ ॥
असतां एक दृष्टीचें सुख । नलगे आम्हा अन्नउदक ॥
दृष्टीच हरी तहान भूक । किती तें कौतुक वानावें ॥ १८ ॥
आम्हांही सकल दृष्टीचा विषय । कृपासिंधू साईराय ॥
दृश्यद्रष्टादर्शन जाय । पुसोनि ठाय त्रिपुटीचा ॥ १९ ॥
तैसेच आम्हा त्वचा स्पर्श । दोहीं ठायीं साई प्रकाश ॥
अथवा घ्राण आणि वास । तेथेंही निवास साईचा ॥ २० ॥

अथवा श्रवणीं शब्द पडे । पडतांच प्रकटे साईचें रूपडें ॥
आत्म श्रावक श्रवण उडे । त्रिपुटी झडे एकसरा ॥ २१ ॥
अथवा जेथें रसनारसें । घोळली तेथें साई सपरसे ॥
रसना रस रसास्वाद बापुडे । कायसें कोडें त्रिपुटीचें ॥ २२ ॥
हेच गती कर्मेंद्रियां । तिहीं एक साई सेविलिया ॥
सकल कर्म जाती विलया । पडेल ठाया नैष्कर्म्य ॥ २३ ॥
असो आतां हा ग्रंथ लांबला । साई प्रेमें कोठेंच वाहवला ॥
पूर्वानुसंधान लक्षूं चला । चालवूं अपुला कथाभाग ॥ २४ ॥
एक मूर्तीपूजा पराङ्मुख । निराकाराचे परम भजक ॥
जाहले शिरडी गमनोत्सुक । केवळ चिकित्सैक बुद्धीनें ॥ २५ ॥
म्हणती आम्ही शिरडीस येऊन । घेऊं केवळ साधूचें दर्शन ॥
आम्हीं न केव्हांही थांकवूं मान । करूं न प्रदान दक्षिणेचें ॥ २६ ॥
मान्य कराल या दोन शर्ती । तरी येऊं कीं शिरडीप्रती ॥
बरें म्हणतां निज मित्रासंगतीं । जावया निघती स्वस्थ मनें ॥ २७ ॥
काका महाजनी त्यांचे मित्र । संतार्थ जयांची भावना पवित्र ॥
परी ते शंका कुशंका पात्र । स्नेही होते तयांचे ॥ २८ ॥
दोघे निघाले शनिवारीं । मुंबईहून रात्रींचे प्रहरीं ॥
येऊनि पातले शिरडी भीतरीं । आदित्यवारीं सकाळा ॥ २९ ॥
दोघे गेले मशीदीस । साई दर्शन घ्यावयास ॥
काय वर्तलें ते समयास । स्वस्थ मानस परिसिजे ॥ ३० ॥
पाऊल टेवितां पायरीवरीं । तया मित्रा पाहूनि दूरीं ॥
"कां यावें जी" ऐसिये परी । बाबा मधुरोच्चारीं बाहिती ॥ ३१ ॥
ऐकूनि हें प्रेमवचन । तया मित्रास पटली खूण ॥
शब्दोच्चाराची ती ठेवण । देई त्यां स्मरण वडिलांचें ॥ ३२ ॥

“ कां यावें जी ” हा उच्चार । काढितां बाबा करिती जो स्वर
तो ऐकतां काकांचे मित्र । विस्मितांतर जाहले ॥ ३३ ॥
परिसोन मोहक स्वराची ठेवण । गत पित्याचें झालें स्मरण ॥
त्यांचेच स्वराची तऱ्हा ही पूर्ण । वाटलें अनुकरण यथार्थ ॥ ३४ ॥
काय वाणीची मोहन शक्ती । काकांचे मित्र विस्मित चित्तीं
म्हणाले ही मम पित्याचीच उक्ती । स्वर हा निश्चिती ओळखीचा ३५
वडिलां मुखींची तैसी ती वैखरी । ऐकतां ते मित्र द्रवले अंतरीं ॥
वंदिले बाबांचे चरण शिरीं । विसरूनि पूर्वील् निश्चय ॥ ३६ ॥
पुढें बाबा दक्षिणा मागती । तीही केवळ काकाच प्रती ॥
काका देती, दोघेही परतती । पुनश्च जाती दुपारा ॥ ३७ ॥
तेव्हांही हे सवेंचि जाती । दोघांही जाणें मुंबईप्रती ॥
काका तेव्हां आज्ञा प्रार्थिती । दक्षिणा मागती बाबा त्यां ॥ ३८ ॥
तीही केवळ काकाच पाशीं । म्हणती सत्रा रुपये दे मजसी ॥
कांहीं न मागत तन्मित्रासी । मग ते मनाशींच चुटपुटले ॥ ३९ ॥
तंव ते काकांस हळूच पुसती । तुम्हासचि कां दक्षिणा मागती ॥
सकाळींही तुम्हांच प्रती । आतांही मागती तुम्हांसची ॥ ४० ॥
मी असूनी तुम्हां संगतीं । दक्षिणेलागी मज कां वगळिती ॥
काका हळूच उत्तर देती । बाबा प्रतीच पुसा हें ॥ ४१ ॥
इतुक्यांत बाबा काकास वदती । तो काय सांगेरे तुजप्रती ॥
तों स्वयेंच ते मित्र बाबांस पुसती । दक्षिणा म्हणती देऊं का ॥४२॥
तंव बाबा उत्तर देती । तुझे मनीं देण्याची नव्हती ॥
म्हणूनि नाहीं मागितली तुज प्रती । देणें चित्तीं तरः देई ॥ ४३ ॥
बाबा मागतां भक्त देत । तयां ते मित्र हिणावीत ॥
तेच न मागतां जें देऊं का म्हणत । आश्चर्यभरित तंव काका ॥ ४४ ॥

म्हणतां चित्तीं असल्यास देईं । तया मित्रास जाहली घाई ॥
सत्रा रुपयांची भरपाई । केली पायीं न मागतां ॥ ४५ ॥

बाबा मग वदती तयास । जासील रे क्षण एक बैस ॥
करिते झाले गोड उपदेश । निरसावया सभेदात्मता ॥ ४६ ॥

तुम्हां आम्हांतील तेल्याची भिंत । पाडूनियां ती टाक समस्त ॥
होईल मग मार्ग प्रशस्त । अरस परस भेटावया ॥ ४७ ॥

पुढें आज्ञा झाले देते । माधवराव जाहले प्रार्थिते ॥
पाहूनि अभ्राच्छादित नभातें । पाऊस यांतें भिजवील ॥ ४८ ॥

बाबा प्रत्युतर त्यां देती । जाऊं दे त्यां स्वस्थ चित्तीं ॥
पाउसाची कांहींही भीती । नाहीं तयांप्रती मार्गांत ॥ ४९ ॥

अभिवंदूनि साईचे पाय । तैसेच गाडींत बैसले उभय ॥
विजा चमकत दाटत धूय । गंगेस पय-पूर लोटला ॥ ५० ॥

गडगडाटें गर्जे आकाश । नौकागमन आलें वांट्यास ॥
काका मनीं पूर्ण विश्वास । होतें आश्वासन बाबांचें ॥ ५१ ॥

पडला विचार त्या मित्रास । कैसा सुखाचा होईल प्रवास ॥
उगीच निघालों यावयास । होतील सायास मार्गांत ॥ ५२ ॥

असो पुढें ते सुखें गेले । अग्निरथांत आरूढ झाले ॥
मेघ मग तेथून वरसूं लागले । निर्भय पावले मुंबईस ॥ ५३ ॥

पुढें जेव्हां आले सदनीं । पाहती खिडक्या द्वारें खोलुनी ॥
गेली अडकली चिमणी उडूनी ॥ गतप्राण दोनी आढळल्या ॥ ५४ ॥

पाहूनि ऐसा तो देखावा । वाईट बहुत वाटलें जीवा ॥
अन्नापाण्यावांचूनि देवा । विचाऱ्या जीवा मुकल्या या ॥ ५५ ॥

निघालों जेव्हां जावया शिरडी । वातायनें जरी ठेवितों उघडी ॥
पडती नाहीं काळाची उडी । मेलीं बापुडीं मजहातें ॥ ५६ ॥

म्हणे आतां उडाली जी । तीनीच जणं बाबांस काळजी ॥
म्हणोन दिधली होऊनि राजी ॥ अनुज्ञा आजी परतावया ॥ ५७ ॥
नाहीं तरी तीही मरती । अन्नावीण कैसी जगती ॥
आयुष्य सरलें तेणें हे गती । पावली निश्चिती ती एक ॥ ५८ ॥
आणीक यांचा अनुभव एक । तोही श्रवणार्ह आहे सुरेख ॥
एका पायांच्या टांचेचें दुःख । भोगीत हे कित्येक मासवरी ॥ ५९ ॥
शिरडीस जाणें घडल्या आधीं । वहुत महिने भोगिली ही व्याधी ॥
तेथून परतल्यापाठी न बाधी । नासली अल्पावधींतची ॥ ६० ॥
ऐसीच आणिक दुसरी कथा । संतांचा अंत लावूं जातां ॥
पायीं नमवावा लागला माथा । मनीं नसतां ती परिसा ॥ ६१ ॥
तैसीच दक्षणा देण्याची नसतां । मोहपाशीं अडकले जातां ॥
भंगूनि अपुली दृढनिश्चयता । दक्षिणा देतात कैसी ती ॥ ६२ ॥
ठक्कर धरमसी जेठाभाई । सॉलिसीटर रहिवास मुंबई ॥
बळावली पूर्व पुण्याई । भेटूं साईस मन झालें ॥ ६३ ॥
महाजनींचे हेच शेट । उभयतांचा परिचय दाट ॥
वाटलें शिरडीस जाऊन थेट । घ्यावी कीं भेट प्रत्यक्ष ॥ ६४ ॥
ठक्करजींच्या पेढींवरी । काका मुख्य कारभारी ॥
सुटी साधोनी हारोहारी । करीत तयारी शिरडीची ॥ ६५ ॥
काका तरी काय वेळीं परतती । आठाठ दिन शिरडीस काढिती ॥
आज्ञा नाहीं साईंची म्हणती । ही काय रीती कामाची ॥ ६६ ॥
ऐसे कैसे तरी हे संत । बंड नव्हे हें आम्हां पसंत ॥
निघाले शेट शिमग्याचे सुटींत । लावाया अंत साईचा ॥ ६७ ॥
अंगीं दुर्धर देहाभिमान । निजैश्वर्याचेंच महिमान ॥
संत तरी मानवा समान । किमर्थ मान वांकवावी ॥ ६८ ॥

पाहूनि साईंची अधिकार स्थिती । शास्त्री पंडित दर्शनास येती ॥
तेथें बापुडे धरमसी ते किती । ते काय लागती निश्चया ॥ ६९ ॥
परी न अंधश्रद्धा धरी । करून घेऊं आपुली खातरी ॥
करूनि ऐसा निश्चय अंतरीं । केली तयारी शिर्डीची ॥ ७० ॥
वर्णिल्या एका स्नेह्याच्या वरती । धरमसीही तेच रीती ॥
सवें काकांस घेऊन निघती । आणीक वदती तयांस ॥ ७१ ॥
शिरडीस जातां तेथेंच रहातो । चालेना या खेपेही वार्ता ॥
परतलें पाहिजे मज समवेता । हें निश्चितता जाणावें ॥ ७२ ॥
तंव काका तयां वदती । हें तो नाहीं आम्हा हातीं ॥
तदा धरमसी सवें घेती । आणीक सांगाती मार्गार्थ ॥ ७३ ॥
न जाणो काका नाहींच परतले । सांगात्यावीण मार्गीं न चले ॥
म्हणूनि आणीक तिजया घेतलें । तिघे निघाले शिर्डीस ॥ ७४ ॥
जगांत ऐशा कित्येक जाती । परोपकारीं भक्तांच्या असती ॥
तयांची कराया संशय निवृत्ती । बाबा आणिती धरूनि ॥ ७५ ॥
मग ते जेव्हां माघारा जाती । आपुले अनुभव इतरां कथिती ॥
लिहूनि घेती कोणाही हातीं । जना सत्पथीं लावाया ॥ ७६ ॥
तात्पर्य हे जे कोणी जाती । दर्शनसुखें तृप्त होती ॥
आरंभीं कैसी ही तयांची वृत्ती । परमानंद प्राप्ती अखेर ॥ ७७ ॥
म्हणोत अपुले पायीं जाती । असे ना का चिकित्सा प्रीती ॥
परी निराळी वस्तुस्थिती । कार्य साधिती बाबांचें ॥ ७८ ॥
बाबांचि तयां देती स्फूर्ती । तेव्हांचि बाहेर पाय काढिती ॥
चेववूनी स्वाभाविक वृत्ती । लाविती परमार्थी तयांस ॥ ७९ ॥
कोण जाणे तयांच्या कळा । जाणं जातां होतील अवकळा ॥
होऊनि निरभिमान पायीं लोळा । भोगाल सोहळा सुखाचा ॥ ८० ॥

बरवें न जाणे रिक्त करीं । देव-द्विज-गुरु द्वारीं ॥
म्हणवूनि द्राक्षाची दो शेरी । काका खरीदीत मार्गांत ॥ ८१ ॥
पोटीं नाहीं बीज ज्यांत । असे ऐसी ही द्राक्षांची जात ॥
परी सबीज जीं वेळीं प्राप्त । घेतलीं विक्रींत काकांनीं ॥ ८२ ॥
असो गोष्टी वार्ता करीत । पातली ही त्रयी शिरडींत ॥
सर्वे तिघेही दर्शनार्थ । गेले मशीदींत बाबांच्या ॥ ८३ ॥
बाबासाहब तर्खड भक्त । हेही होते तेथें स्थित ॥
शेट धरमसी जिज्ञासा प्रेरित । पुसती तयांप्रत तें परिसा ॥ ८४ ॥
येथें काय आहे कां येतां । तर्खड वदती दर्शनाकरितां ॥
शेट म्हणती ऐकिली वार्ता । येथें तों घडतात चमत्कार ॥ ८५ ॥
तंव तर्खड वदती त्यांना । ही तो नाहीं माझी भावना ॥
जैसी उत्कंठा जयाचे मना । पावे ती कामना सीद्धीतें ॥ ८६ ॥
काकांनी पायीं डोई ठेविली । द्राक्षें बाबांच्या करीं अर्पिलीं ॥
वाटावयाची सुरवात झाली । मंडळी जमली होतीच ॥ ८७ ॥
बाबा तंव इतरां समवेत । धरमसीसही कांहीं देत ॥
परी तयां ती नावडती जात । निर्बी जीं प्रीत तयांस ॥ ८८ ॥
या द्राक्षांची तयास चीड । आरंभींच उपजली नड ॥
कैसीं सेवावीं वाटलें अवघड । अन्हेरही जड वाटे मना ॥ ८९ ॥
शिवाय डाक्टरें केलें मना । द्राक्षें न खावीं धुतल्याविना ॥
आपणची धुणें योग्य वाटेना । उठल्या कल्पना नानाविध ॥ ९० ॥
पुढें तैशींच टाकिलीं तोंडांत । बिया चघळूनि ठेविल्या खिशांत ॥
साधूंचें तें स्थान पुनीत । करवेना अपुनित उच्छिष्टें ॥ ९१ ॥
तंव ते शेट मनीं म्हणती । साधू असतां कैसें हें नेणती ॥
कीं हीं द्राक्षें मज नावडती । बळेंच कां देती मजप्रती ॥ ९२ ॥

रठतां ऐसी तयांची वृत्ती । बाबा तींच आणीक त्यां देती ॥
तीं सबीज जाणूनि हातींच ठेविती । मुखीं न घालिती धरमसी ॥९३॥
सबीज नावडतीं द्राक्षें खरीं । परीं तीं बाबांनी दिधलीं करीं ॥
धरमसी शेट अवघडले अंतरीं । कैसिये परी वर्तावें ॥ ९४ ॥
तोंडीं घालावया होईना मन । करूनि ठेविलीं मुठींत जतन ॥
तंव बाबा वदती "टाकरे खाऊन" । मानिलें आज्ञापन शेटीनें ॥९५॥
खाऊनि टाक बाबा वदतां । धरमसींनीं तोंडांत टाकितां ॥
बीज रहित तीं सर्वही लागतां । अति आश्चर्यता पावले ॥ ९६ ॥
ऐसीं निर्बीज द्राक्षें लागतां । धरमसी होऊनि विस्मित चित्ता ॥
मनीं म्हणे अजब सत्ता । काय या संतां अशक्य ॥ ९७ ॥
जाणोनि माझे मनीचा हेत । असतां सबीज आणि निर्बीज ॥
साई मज जीं जीं देत । तीं तीं बीजरहित हितकारी ॥ ९८ ॥
थक्क झाली चित्तवृत्ती । चिकित्सेची पडली विस्मृती ॥
गळाली सर्व अहंकृती । संतीं प्रीती उपजली ॥ ९९ ॥
पूर्व संकल्प गेले विलया । सांई प्रेम उपजलें हृदया ॥
उत्कंठा जी शिरडीस यावया । पुरली कृतनिश्चया सारखी ॥ १०० ॥
बाबा तर्खड देही तेथें । बाबापाशींच बसले होते ॥
बाबा साई जाहले वाटते । त्यांतील त्यांतेंही कांहीं ॥ १०१ ॥
तेव्हां धरमसी तयांही पुसती । अपुलीं द्राक्षें कैसीं होतीं ॥
बाबा जेव्हां सबीज म्हणती । विस्मित चित्तीं अतिशय ॥ १०२ ॥
तेणें ते साधूही श्रद्धा बसली । दृढीकरणार्थ कल्पना स्फुरली ॥
साधू असाल तरी हीं पुढलीं । जातील दिधलीं काकांना ॥ १०३ ॥
बाबा वाटीत होते बहुतां । परी हें स्फुरतां शेटीचे चित्ता ॥
काकापासूनच शेज धरितां । अति नवलता शेटीस ॥ १०४ ॥

ऐशा साधुत्वाच्या खुणा । ऐसा हा मनकवडेपणा ॥
पुरा झाला धरमसीच्या मना । साधू साईंना मानावया ॥ १०५ ॥
माधवराव होते तेथें । ते मग झाले बाबांस निवेदिते ॥
काकांचे मालक शेट हे ते । झाले समजाविते बाबांस ॥ १०६ ॥
हा कुडला काकाचा मालक । त्याचा मालक आहे आणिक ॥
बाबा प्रत्युत्तर देती चोख । काकांस तोखदायकसें ॥ १०७ ॥
आणीक कैसी नवलपरी । आपा नामें एक आचारी ॥
उभा तेथेंच धुनीशेजारी । बाबा तयावरी घालिती ॥ १०८ ॥
म्हणती हे शेटजी इथवर आले । ते मजकरितां नाहीं श्रमले ॥
आपालागीं प्रेम दाटलें । म्हणून पातले शिरडीस ॥ १०९ ॥
असो ऐसें हें भाषण झालें । धरमसी अंपुले निश्चय विसरले ॥
आपण होऊन पाया पडले । मग ते परतले वाड्यांत ॥ १०१ ॥
असो माध्यान्ही आरती झाली । घरीं जाण्याची तयारी चालली ॥
आज्ञा घेण्याची वेळ आली । मंडळी निघाली मशीदी ॥ १११ ॥
धरमसी तेव्हां काकांस वदत । मी तो नाहीं आज्ञा मागत ॥
तुम्हींच मागा तुम्हा ती लागत । तंव काय म्हणत माधवराव ॥ ११२ ॥
काकांचें तो नाहीं प्रमाण । आठवडा एक भरल्यावीण ॥
होणार नाहीं आज्ञापन । आपणचि विचारूनि घ्यानां का ॥ ११३ ॥
पुढें हें तिथे जाऊनि बैसतां । माधवराव आज्ञा मागतां ॥
बाबांनीं सांगू आरंभिली वार्ता । ती स्वस्थ चित्ता परिसावी ॥ ११४ ॥
होता एक चंचलबुद्धि । घरीं धन धान्याची समृद्धि ॥
शरीरीं नाहीं आधी व्याधी । नसती उपाधी आवडे ॥ ११५ ॥
उगाच बोजा वाही माथा । हिंडे इतःस्ततः नाहीं स्वस्थता ॥
खालीं ठेवी उचली मागुता । नाहीं निश्चलता मनास ॥ ११६ ॥

पाहूनि ऐसी तयाची अवस्था । कींव आली माझिया चित्ता ॥
"वाटेल त्या एका ठायीं आतां । ठेवरे निश्चिंतता" म्हणालों॥११७॥

उगाच ऐसा भ्रमतोस । एका ठायींच स्वस्थ बैस ॥
वार्ता खोंचली धरमसीस । मानीत आपणास इशारा तो ॥ ११८ ॥

असोनि वैभव यथास्थित । कारण नसतां यत्किंचित ॥
धरमसी सदां चिंताक्रांत । डोकें पिकवीत उगाच ॥ ११९ ॥

असतां विपुल संपत्ती मान । मनास नाहीं समाधान ॥
पाठीसि काल्पनिक दुःखें गहन । त्यांतची निमग्न सर्वदा ॥१२०॥

ऐकतां साईमुखींची कथा । शेटजी परम विस्मित चित्ता ॥
ही तो आपुले मनाची अवस्था । अति सादरता परिसिली ॥१२१॥

काकास इतुकी लवकर आज्ञा । अशक्य कोटीची ही घटना ॥
परी तीही मिळतां प्रयासाविना । धरमसी मनांत संतुष्ट ॥ १२२ ॥

काकानें निघावें बरोबर । धरमसीची इच्छा फार ॥
तीही बाबांनीं पाडिली पार । देऊनि होकार जावया ॥ १२३ ॥

हाही एक शेटजीचा पण । कैसी बाबांनीं जाणिली खूण ॥
हेंही एक साधुत्व लक्षण । पटलें विलक्षण धरमसींना ॥ १२४ ॥

जाहली संशय निवृत्ति । साई साधू ही अभिव्यक्ति ॥
जया मनीं जैसी वृत्ती । तैसीच अनुभूती दाविली ॥ १२५ ॥

ज्या ज्या मार्गें जावूं इच्छिती । तो तोच मार्ग तया लाविती ॥
साई जाणती अधिकार संपत्ती । परमार्थ प्राप्तीही त्यामानें ॥१२६॥

भक्त भावार्थी अथवा टवाळू । साई समत्वें दोघांसीं कृपाळू ॥
एकास टाळू दुजिया कवटाळू । नेणें ही कनवाळू माउली ॥ १२७ ॥

तंव ते दोघे जेव्हां निघती । पंधरा रुपये काकांपाशीं ॥
बाबा दक्षिणा मागूनि घेती । सवेंच वदती काकांस ॥ १२८ ॥
दक्षिणेलागीं ज्यानें मजला । असेल एक रुपया दिधला ॥
दशगुणें मज तया मोबदला । द्यावा लागला मोजून ॥ १२९ ॥
मी काय कोणाचें घेईना फुकट । मागें न मी सर्वां सरसकट ॥
फकीर ज्यासी दावी बोट । तयासिच गोष्ट दक्षिणेची ॥ १३० ॥
तोही फकीर जयाचा ऋणी । तयासिच ही करी मागणी ॥
दाता देऊनि करी पेरणी । पुढें संवगणी करावया ॥ १३१ ॥
वित्त हें केवळ धर्मद्वारा । वित्तवंता पडेल आहे उपकारा ॥
धर्मैक फळ हें एणेंच खरा । ज्ञानासि थारा लाधतो ॥ १३२ ॥
दुःख संपाद्य हें वित्त । केवळ आहे इष्टोपभोगार्थ ॥
व्यर्थ निष्कारण वेंचितात । धर्म संचित अवगणुनी ॥ १३३ ॥
करूनिया कवडी कवडी । अर्बुदांत धन जें जोडी ॥
तें विषय स्वार्थाचिया आवडी । कदा न दवडी तो सुखी ॥ १३४ ॥
नादत्तमुपतिष्ठती । सकळांस ठावी कीं ही श्रुती ॥
पूर्वदत्त ठाके पुढती । तदर्थ मागती दक्षिणा ॥ १३५ ॥
रामावतारीं रघुनंदनें । आपार स्वर्ण स्त्रियांचीं दानें ॥
करितां शोडश सहस्र प्रमाणें । घेतलें कृष्णें तत्फल ॥ १३६ ॥
भक्ति ज्ञान वैराग्य हीन । ऐसा जो भक्त तो अति दीन ॥
तयास प्रथम वैराग्यीं स्थापून । भक्तिज्ञान मग देती ॥ १३७ ॥
करवितां जें दक्षिणा प्रदान । तीच वैराग्याची खूण ॥
पुढे भक्तिपंथास लावून । ज्ञान प्रवीण करवीत ॥ १३८ ॥

---

१ दिल्यावांचून मिळत नाहीं.

आम्ही तरी काय करितों । एकपट घेतों दसपट देतों ॥
क्रमें क्रमें ज्ञानपथा लावितों । लोभ उठतो धरपर्यानें ॥ १३९ ॥
आपण होऊनि रुपये पंधरा । ठेविते झाले बाबांचे करा ॥
विसरले पूर्व कृत निर्धारा । प्रकार साराच अपूर्व ॥ १४० ॥
वाटलें आधीं वृथा जल्पलों । बरें केलें समक्ष आलों ॥
साधू कैसे असतात बोधलों । तयांचे लोधलों अनुभवीं ॥ १४१ ॥
असो दृढ न विचारितां मनीं । आम्ही येणार नव्हतों नमनीं ॥
तेही आलों आपण होऊनी । साधूंची करणी अगम्य ॥ १४२ ॥
"अल्ला मालिक" मुखीं निरंतर । तयास काय आहे दुष्कर ॥
आम्ही पहावया होतों आतुर । केवळ चमत्कार साधूंचे ॥ १४३ ॥
वृथा झाला आमुचा पण । घातलें मानवा लोटांगण ॥
न मागतांही दक्षिणा प्रदान । केलें आपण होऊन ॥ १४४ ॥
वृथा आमुची सारी बढाई । आपण होऊन आपुली डोई ॥
पूज्य भावें साईपायीं । वाहिली नवाई काय दुजी ॥ १४५ ॥
काय वानूं हीं साईची कुसरी । हें सर्व जरी तो स्वयेंच करी ॥
बाह्यात्कारी अलिप्तता धरी । नवलपरी ती काय दुजी ॥ १४६ ॥
कोणी करा वा न करा वंदन । द्या अथवा न द्या दक्षिणा दान ॥
आनंदकंद साई दयाघन । करी न अवगणन कोणाचें ॥ १४७ ॥
पूजिल्याचा नाहीं आनंद । अवमानिल्याचा नाहीं खेद ॥
हर्ष न तेथें कैचा विषाद । पूर्ण निर्द्वंद्व ते हे स्थिति ॥ १४८ ॥
असो कोणाचा कांहीही हेत । एकदां जयांसी दर्शन देत ॥
तयाची भक्ती पायीं जडवीत । शक्ती ही अद्भुत साईची ॥ १४९ ॥

असो पुढें उदी प्रसाद । पावूनि घेऊनि आशिर्वाद ॥
परतले ते निर्विवाद । ख्याती ही अगाध साईची ॥ १५० ॥
करावया तेथून निर्गमन । लागे बाबांचें आज्ञापन ॥
करितां आज्ञेचें उल्लंघन । निमंत्रण तें विघ्नांसी ॥ १५१ ॥
आपमतीं करितां निष्क्रमण । अनुताप आणि विटंबन ॥
मार्गांत व्यत्यय येती दारुण । तयांचें निवारण दुष्कर ॥ १५२ ॥
ऐसी वर्णिली तेथील निर्गती । आमुतीचीही तेच स्थिती ॥
मी न आणितां कोणी न येती । ऐसी वदंती बाबांची ॥ १५३ ॥
माझी इच्छा झालियावीण । दारवंठा त्यागील कवण ॥
कोणा स्वेच्छें होईल दर्शन । घडेल आगमन शिर्डीचें ॥ १५४ ॥
साई समर्थ कृपा मूर्ती । तया आधीन आमुची गती ॥
कृपा उद्भवेल तयांचे चित्तीं । तेव्हांच येतील दर्शना ॥ १५५ ॥
ऐसें तेथील गमनागमन । नसतां साईचें चित्त प्रसन्न ॥
होई न कोणासही आज्ञापन । उदीप्रदान समवेत ॥ १५६ ॥
करुनिया अभिवंदन । मागूं जातां आज्ञापन ॥
उदी समवेत आशिर्वचन । तेंच आज्ञापन निघावया ॥ १५७॥
आतां एक विभूतीचा अनुभव । श्रोतयांलागी कथितों अभिनव ॥
मग नेवासकर भक्ति प्रभाव । महानुभाव साई कृपा ॥ १५८ ॥
वांद्रे शहरचा एक गृहस्थ । तोही जातीचा प्रभू कायस्थ ॥
रात्रीं निद्रा येऊं नये स्वस्थ । जाहली शिकस्त यत्नांची ॥ १५९ ॥
डोळ्यास डोळा लागूनि निद्रित । असतां क्षणैक अकस्मात ॥
स्वप्नीं तयाचा मृततात । करी जाग्रत प्रतिदिनी ॥ १६० ॥

पूर्वील शुक्राशुक्र प्रकार ॥ गुप्त गर्भी विरुद्ध विचार ॥
मिथ्या शाप पूर्वक उच्चार । वाक् प्रहार प्रेरी तो ॥ १६१ ॥
प्रतिदिनीं ऐसा प्रसंग । प्रतिदिनीं होय निद्रा भंग ॥
पडेना कांहीं उमंग । चुकेना भोग पाठीचा ॥ १६२ ॥
तेणें तो गृहस्थ कंटाळला । उपाय कांहीं न सुचे तयाला ॥
पुसे एका साई भक्ताला । करावा इलाज काय तरी ॥ १६३ ॥
आम्ही न जाणूं अन्य उपाय । साई महाराज महानुभाव ॥
ठेवाल जरी तुम्ही ही भाव । उदी निज प्रभाव प्रकटील ॥ १६४ ॥
जैसें जैसें तया कथिलें । तैसें तैसें तयानें केलें ॥
अनुभवाही तैसेंच आलें । दुःस्वप्न पडलें नाहीं पुनः ॥ १६५ ॥
कर्म-धर्म-वशें ते मित्र । होते साई समर्थ छात्र ॥
जाणूनि उदीचा महिमा विचित्र । अर्पीत लवमात्र तयांस ॥ १६६ ॥
म्हणती जातां निजावयास । लावा थोडी मस्तकास ॥
पुडी बांधूनि ठेवा उशास । मनीं श्री साईस आठवा ॥ १६७ ॥
पोटीं ठेवा भक्तिभाव । पहा मग या उदीचा प्रभाव ॥
तात्काळ करील पीडेचा अभाव । सहज स्वभाव हातीचा ॥ १६८ ॥
ऐसें होतांच लागली त्याला । गाढ निद्रा त्या रात्रीला ॥
दुष्ट स्वप्नाचा ठावचि पुसिला । अति आनंदला गृहस्थ ॥ १६९ ॥
मग त्या त्याच्या आनंदास । काय पाहिजे पुसावयास ॥
पुडी ती नित्य रक्षी उशास । स्मरे साईस नित्यशः ॥ १७० ॥
पुढें बाबांची छवी आणिली । गुरुवार साधून माळ वाहिली ॥
उशागती भिंतीस लाविली । आदरें पूजिली तयानें ॥ १७१ ॥

घेऊं लागला छबीचें दर्शन । गुरुचरणीं माळा समर्पण ॥
करी नित्य मानसिक पूजन । पीडा निवारण जाहली ॥ १७२ ॥

ऐसी चालविली नेम निष्ठा ॥ पावला तो स्थाई अभीष्टा ॥
निद्राभंगादि दुःस्वप्नानिष्टा । विसरला कष्टां पूर्वील ॥ १७३ ॥

हा तो उदीचा एक उपयोग । कथितों आणीक अद्भुत योग ॥
कैशाही संकटीं करितां प्रयोग । अभीष्ट भोग देई ती ॥ १७४ ॥

होता एक भक्त थोर । बाळाजी पाटील नेवासकर ॥
बाबालागी झिजविलें शरीर । सेवा लोकोत्तर करूनी ॥ १७५ ॥

गावांत नित्य जाण्यायेण्याचे । तैसेंच लेंडीची फेरी फिरण्याचे ॥
हे बाबांचे रस्ते झाडण्याचें । नेवासकरांचें नित्य काम ॥ १७६ ॥

याच सेवेची परिपाटी । चालू राहिली तयांचे पाठीं ॥
राधाकृष्णा बाईची हातोटी । अलौकिक मोठी ये कामीं ॥ १७७ ॥

वर्ण ब्राह्मण अखिल वंद्य । आणी ही सेवा ऐसी निंद्य ॥
शिवलें न केव्हांही हें विचारमांद्य । तियेच्या अनवद्य अंतरा ॥ १७८ ॥

---

१ या बाई जातीनें देशस्थ ब्राह्मण होत्या. यांचें मूळचें नांव सुंदराबाई क्षीरसागर. पण त्या कोणाही माणसास हांक मारतांना 'राधाकृष्णा' म्हणून हांक मारीत, म्हणून 'राधाकृष्णाबाई' हें त्यांचें नांव पडलें. त्या नेहमी एक पितळी लंगड्या बाळकृष्णाची मूर्ती जवळ बाळगीत. ती त्यांचें स्नान, जेवणखाण, निजणें, वगैरे त्या वेळीं बरोबर असे. साईबाबा त्यांना 'रामकृष्णी' म्हणत, व रोज स्वतः जेवायाला बसावयाचें आधीं, त्यांना दोन भाकऱ्या आणि वर तोंडीं लावण्यास कांहीं भाजी वगैरे, दुपारचे जेवणाचे वेळीं पाठवीत. त्या मशीदींत कधींही येत नसत. त्या बालविधवा स्थितींतही शरबींत राहून पडेल ती संतसेवा मनोभावें करीत. नेहमीं भजन करीत.

उठोनिया सकाळचे प्रहरीं । झाडू घेऊनियां निजकरीं ॥
स्वयें ही बाबांचे रस्ते वारी । धन्य चाकरी तियेची ॥ १७९ ॥
काम निर्मळ आणि सत्वर । कोण अन्य पावेल ती सर ॥
पुढें मग जातां कांहीं अवसर । अबदुल सरकला पुढारा ॥ १८० ॥
असा तो पाटील महाभाग । संसारीं वर्तून संसार विराग ॥
केवढा तयाचा स्वार्थत्याग । परिसा तो भाग कथेचा ॥ १८१ ॥
होतां शेताची सवंगणी । धान्य समस्त मशीदी आणी ॥
रचवूनि ढिगार तेथेंच अंगणीं । समर्पी चरणीं बाबांच्या ॥ १८२ ॥
मानूनी बाबा सर्वस्व धनी । ते जें देतील त्यांतुनी उचलूनी ॥
तितुकेंच धान्य घरीं नेउनी । गुजारा करुनी राही तो ॥ १८३ ॥
महाराजांनीं स्नान करुनी । हात पाय वा तोंड धुवुनी ॥
आलेलें मोरीचें सांडपाणी । बाळा पिऊनि राहतसे ॥ १८४ ॥
हे नेवासकर असेपर्यंत । चालला हा नेम अव्याहत ॥
अजूनि तयांचा प्रेमळ सुत । चालवी हें व्रत अंशतः ॥ १८५ ॥

---

१ झाडून स्वच्छ करी. २ हा एक बाबांचा निःसीम भक्त असून, बायको, मुलेंबाळें घरदार सोडून श्रीच्या सेवेंत राहिला असून मशीद, चावडी व समाधीच्या स्थानीं दिवाबत्तीची व्यवस्था हा हातानें करीत असतो आणि समाधीस वेळोंवेळीं स्नान घालणें, फुलें, चादरी, माळा व गलेफ चढविणें वगैरे अशाच तऱ्हेचीं इतर सर्व कामें हा केवळ श्री साईंच्या प्रेमानें संस्थानांतून तत्प्रीत्यर्थ कांहीं ही पगार न घेतां करीत असतो व फावल्या वेळांत समाधीपाशीं कुराण वाचीत असतो. याला जेवण, थोडी अफू व चहा देण्याची तजवीज संस्थानांतून होत असते.

तोही धान्य पाठवी सतत । त्यांतील नोकराची भाकर नित ॥
महाराज निज निर्वाणांत । खात असत चार वेळां ॥ १८६ ॥

असो एकदा काय घडलें । वर्षश्राद्ध बाळाचें आलें ॥
अन्न शिजवून तयार झालें । वाढूं लागले वाढपी ॥ १८७ ॥

येणाऱ्यांचा अंदाज धरुनी । पाकसिद्धी होती सदनीं ।
वाढते वेळीं अंदाजाहुनी । संख्या त्रिगुणीत जाहली ॥ १८८ ॥

नेवासकरीण मनीं घाबरली । सासूबाईशीं कुजबुजूं लागली ॥
फजीतीची पाळी आली । कैसी निवारिली जाईल ॥ १८९ ॥

सासूबाईची निष्ठा थोर । आपुले साईं समर्थ खंबीर ॥
असतां किमर्थ करावा घोर । राही तूं निर्घोर म्हणे ती ॥ १९०

ऐसें सासूनें आश्वासुनी । उदी एक मूठभर घेउनी ॥
घातली अन्नाच्या प्रत्येक वासनीं । वासनें वस्त्रांनीं अच्छादिलीं॥१९१॥

म्हणे तूं जा खुशाल वाढ ॥ वाढण्या पुराच कपडा काढ ॥
पुनश्च पूर्ववत् कपडा ओढ ॥ खूणही दृढ सांभाळी ॥ १९२ ॥

हें साईच्या घरचें अन्न ॥ आपुला नाहीं एकही कण ॥
तोच करील लज्जा रक्षण । त्याचें उणेंपण तयाला ॥ १९३ ॥

असो जैसा त्या सासूचा निश्चय । तैसाच तिजला आला प्रत्यय ।
कांहीं एक न येता व्यत्यय । जेवले पाहुणे पय सुद्धां ॥ १९४ ॥

आले गेले सर्व जेवले । यथासांग सर्व झालें ॥
तरी ही अन्न शिल्लक राहिलें । पात्रीं भरलेलें पूर्ववत ॥ १९५ ॥

उदीचा हा ऐसा प्रभाव । संतांचा हा सहज स्वभाव ॥
जया मनीं जैसा भाव । तया अनुभव ही तैसाच ॥ १९६ ॥

असो उदीचा महिमा गातां । नेवासकराची आणीक कथा ॥
पाहोनि त्याची भक्तिमत्ता । आठवली चित्ता ती ऐका ॥ १९७ ॥
होईल काय विषयांतर । एकदां शंकूं लागलें अंतर ॥
होईल तें होवो परी ती सादर । प्रसंगानुसार करावी ॥ १९८ ॥
ऐसा निश्चय करुनि मन । कथा कथितों इये स्थानीं ॥
जरी वाटली ती अस्थानीं । क्षमा श्रोत्यांनीं करावी ॥ १९९ ॥
एकदां शिरडीचा रहिवासीं । रघू पाटील नाम जयासी ॥
पाहुणा गेला नेवाशासी । याचेच गृहासीं उतरला ॥ २०० ॥
गुरें ढोरें दावणीसीं । बांधिलीं असतां एके निशीं ॥
भुजंग एक फूंफूं शब्देशीं । गोठ्यांत प्रवेशी अवचित ॥ २०१ ॥
पाहोनिया ऐसा प्रसंग । जाहली सर्वांची मती गुंग ॥
करोनिया तो फणा भुजंग । यथासांग बैसला ॥ २०२ ॥
गुरें करूं लागलीं गडबड । सुटावयालागी धडपड ॥
नेवासकराचा ग्रह सुदृढ । साईच प्रकट जाहले ॥ २०३ ॥
आतां गुरें सोडिल्या शिवाय । येथें नाहीं अन्य उपाय ॥
नाहीं तरी पडून पाय । होईल अपाय एकादां ॥ २०४ ॥
दुरोनि देखिला भुजंग । हर्षित नेवासकरांतरंग ॥
जाहला पुलकित सर्वांग । केला साष्टांग प्रणिपात ॥ २०५
म्हणे साईंचीं कृपा दृष्टि । भुजंग रूपें आले भेटी ॥
आणिली दुग्ध भरोनि वाटी । भुजंगा साठीं तयानें ॥ २०६ ॥
काय त्या बाळाजीची वृत्ति । चित्ता न ज्याच्या अणुमात्र भीति ॥
पहा काय वदे भुजंगा प्रती । सावध श्रोतीं परिसीजे ॥ २०७ ॥

कांहीं बाबा फों फों करितां । काय आम्हां चित्रें पडतां ॥
ह्या ही दुधाची वाटी आतां । स्वस्थ चित्ता येता ही ॥ २०८ ॥

वाटीनें त्यास काय होय । तपेलें भरून आणिलें पय ॥
पुढें ठेविलें अंतरीं निर्भय ॥ भावनेचें भय सारें ॥ २०९ ॥

दूध ठेवूनि तयाचे जवळीं । जाऊनि बसला पूर्वस्थळीं ॥
नाहीं दूर नाहीं जवळी । मुखीं नवाळी भुजंगाची ॥ २१० ॥

भीतिप्रद भुजंगागमन । सर्वांचें काय सारखें मन ॥
गेले सर्व गांगरून । कैसें हें विघ्न निरसेल ॥ २११ ॥

बाहेर जावें तरी भीति । भुजंग गेलिया अंधारा प्रती ॥
कठीण तेथून बहिर्निसृती । बैसले पाळती ठेवूनि ॥ २१२ ॥

इकडे भुजंग तृप्त झाला । चुकवूनिया सर्वांचा डोळा ॥
नकळे गेला कवण्या स्थळा । आश्चर्य सकळां वाटलें ॥ २१३ ॥

मग तो सर्व गोठा शोधिला । परी न यत्किंचित्‌ थांग लागला ॥
बहुतेकांचा जीव स्थिरावला । मनीं चुकचुकला नेवासकर ॥ २१४ ॥

आरंभी गोठ्यांत जेव्हां प्रवेशला । तेव्हां जैसा दृष्टीस पडला ॥
तैसाच जातांना असता दिसला । हीच तयाला चुकचुक ॥ २१५ ॥

बाळास होत्या स्त्रिया दोन । पुत्र संतती होती लहान ॥
कधीं कधीं नेवाशाहून । येती दर्शन घ्यावया ॥ २१६ ॥

बाबा तया दोघींप्रत । चोळ्या लुगडीं विकत घेत ॥
साशिर्वाद तयां अर्पीत । ऐसा तो भक्त बाळाजी ॥ २१७ ॥

हा सच्चरित मार्ग धोपट । जेथें जेथें याचा पाठ ॥
तेथेंच द्वारका माईचा मठ । साईही प्रकट निश्चयें ॥ २१८ ॥

तेथेंच गोदावरीचें तट । तेथेंच शिरडी क्षेत्र निकट ॥
तेथेंच साई धुनी सकट । स्मरतां संकट निवारी ॥ २१९ ॥

तेथें साईचरित्र पठण । तेथें सदैव साईनिवसन ॥
श्रद्धापूर्वकचरित्रावर्तन । करितां तो प्रसन्न सर्व भावें ॥२२०॥

स्मरतां साई स्वानंदघन । जपतां तन्नाम अनुदिन ॥
नलगे इतर जपतप साधन । धारणा ध्यान खटपट ॥ २२१ ॥

साई चरणीं ठेवूनि प्रीती । जे जेया साईची विभूती ॥
नित्यनेमें सेविती लाविती । ते ते पावती मनेप्सित ॥ २२२ ॥

धर्मादि चारी पुरुषार्थ । पावोनि होती ते कृतार्थ ॥
प्रगट होतील सकल गुह्यार्थ । स्वार्थपरमार्थ समवेत ॥ २२३ ॥

महापापादि पापें प्रबळ । तैसींच उपपातकेंही सकळ ॥
उदी संपर्कें होती निर्मूळ । लाभे निर्मळता सबाह्य ॥ २२४ ॥

ऐसें हे विभूति धारण । भक्तांसि ठावें हें महिमान ॥
श्रोत्यांचेंही व्हावें कल्याण । म्हणून हें वर्णन वाढविलें ॥ २२५ ॥

वाढविलें ही भाषा असार्थ । नेणें मीही महिमा यथार्थ ॥
तरीही श्रोत्यांचिया हितार्थ । संकलितार्थचि निरूपिला ॥ २२६ ॥

म्हणूनि श्रोतयांस हीच प्रार्थना । करूनि साईप्रति वंदना ॥
आपणचि अपुला अनुभव घ्याना । इतुकेंचि माना मद्वच ॥ २२७ ॥

येथें नाहीं तर्काचें काम । पूज्यभाव व्हावा सकाम ॥
नलगे बुद्धिचापल्योपक्रम । पाहिजे परम श्रद्धाळू ॥ २२८ ॥

श्रद्धा विहीन केवळ तार्किक । वादोन्मुख आणि चिकित्सक ॥
तयां न संतज्ञान सम्यक शुद्ध । भाविक तें पावे ॥ २२९ ॥

कथांतर्गत न्यूनातिरिक्त । सर्व मानूनि साई प्रेरित ॥
होऊनि दोष दृष्टीविरहित । साईसच्चरित वाचावें ॥ २३० ॥

साई परम कनवाळू प्रीती । रसिक वाचकवृंद चित्तीं ॥
एणें मिषें स्थापो निजमूर्ति । नित्य स्मृति व्हावया ॥ २३१ ॥

कोठें गोमांतक कोठें शिरडी । तेथील चोरीची कथा उघडी ॥
साई साद्यंत कथी सुख परवडी । कथा चोखडी पुढारा ॥ २३२ ॥

म्हणूनि हेमाड साई चरणीं । ठेवी मस्तक अंतःकरणीं ॥
विनवी श्रोतयां अति नम्रपणीं । सादर श्रवणीं व्हावया ॥ २३३॥

स्वस्ति श्री संतसज्जनप्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थसच्चरिते । चिकित्साखंडणविभूतिमंडनं नाम ।
पंचत्रिंशत्तमोध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ॥